**भारत सरकार**

## विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३

**(सन १९७३ चा अधिनियम क्रमांक ५०)**

(                    रोजी यथाविद्यमान)

# The Authoritative Texts (Central Laws) Act, 1973

(Act No. 50 of 1973)

(As in force on the          )

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२०१७

**[किंमत रुपये :          ]**

# प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३

## कलमांचा क्रम

**कलमे**

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. केंद्रीय कायद्यांचा विवक्षित भाषांमध्ये प्राधिकृत पाठ.

३. नियम करण्याचा अधिकार.

# [१][प्राधिकृत पाठ] (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३
## (१९७३ चा अधिनियम क्रमांक ५०)
## (                    रोजी यथाविद्यमान)

[५ डिसेंबर, १९७३.]

केंद्रीय कायद्यांचा विवक्षित भाषांमध्ये [१][प्राधिकृत पाठ] करण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या चोविसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, [२][प्राधिकृत पाठ] (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ असे म्हणावे.

(२) तो, केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [३][दिनांकास] अंमलात येईल.

**केंद्रीय कायद्यांचा विवक्षित भाषांमध्ये [४][प्राधिकृत पाठ.]**

२. (क) कोणत्याही केंद्रीय अधिनियमाचा किंवा राष्ट्रपतीने प्रख्यापित केलेल्या कोणत्याही अध्यादेशाचा, किंवा

(ख) संविधानाअन्वये किंवा कोणत्याही केंद्रीय अधिनियमाअन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाचा, नियमाचा, विनियमाचा किंवा उपविधीचा,

संविधानाच्या आठव्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या (हिंदीहून अन्य) कोणत्याही भाषेतील, राष्ट्रपतीच्या प्राधिकाराअन्वये **राजपत्रात** प्रसिद्ध केलेला अनुवाद हा त्याचा अशा भाषेतील [४][प्राधिकृत पाठ] असल्याचे मानण्यात येईल.

**नियम करण्याचा अधिकार.**

३. (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, केंद्र सरकारला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) या कलमाअन्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ते सत्रासीन असताना ठेवण्यात येईल, आणि जर पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लागोपाठचे सत्र संपण्यापूर्वी त्या नियमात कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच लागू होईल किंवा, यथास्थिति, मुळीच लागू होणार नाही, तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये तत्पूर्वी करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

---

[१] १९८८ चा अधिनियम क्रमांक १८, कलम २ द्वारे " प्राधिकृत अनुवाद " या मजकुराऐवजी दाखल केला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे " प्राधिकृत अनुवाद " या मजकुराऐवजी दाखल केला.

[३] १ जुलै, १९८१, पहा अधिसूचना क्रमांक स्थायी आदेश ४८२ (ङ), दिनांक १५ जून १९८१, भारताचे **राजपत्र**, असाधारण, भाग दोन, विभाग ३ (दोन).

[४] १९८८ चा अधिनियम क्रमांक १८, कलम ४ द्वारे " प्राधिकृत अनुवाद " या मजकुराऐवजी दाखल केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई